माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४५६/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. भोपेंद्रर पमनानी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (बी.पी.) सिटी-१**
बृहन्मुंबई महानगरपालिका विभाग, कार्यकारी अभियंता, जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
१ ला मजला, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई -१३

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता जी/द**
बृहन्मुंबई महानगरपालिका विभाग, कार्यकारी अभियंता, जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
१ ला मजला, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई -१३

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २२.०१.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र.मु.मा.आ.नों.क्र. १६८७/२०१८ रा.मा.आ.अपील क्र. ५९४/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. २०.०९.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना सात दिवसांमध्ये उपलब्ध माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अन्वये निशुल्क द्यावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. ११.१०.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (बी.पी.), सिटी- १, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/ दक्षिण विभाग, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि.०६.११.२०१९ व दि. १५.१२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (बी.पी.), सिटी- १, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/ दक्षिण विभाग, मुंबई यांनी त्यांचा अहवाल आयोगास अप्राप्त आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २२.०१.२०२५ आयोगास सादर करुन नमुद केले की, अर्जदार यांच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त दि. १३.१२.२०१९ रोजीच्या अर्जामध्ये विचारणा केलेली माहिती व व्दितीय अपिलाच्या अनुषंगाने प्राप्त आदेशानुसार या कार्यालयात परिरक्षित असलेली सर्व संबंधीत एकुण पृष्ठ १२० या कार्यालयामार्फत दि. २६.०३.२०२४ रोजी अर्जदार यांना विनामुल्य देण्यात आली आहे. सदर बाबतची पोच त्यांनी स्वाक्षरी करुन स्विकारली आहे.

..२/-

तक्रारकर्ता यांनी माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश दि. २०.०९.२०१९ प्रमाणे तक्रारकर्ता यांना माहिती पुरविलेली आहे. तथापि, माहिती उशिराने देण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी यापुढे आयोगाचे आदेशाचे पालन कटाक्षाने करावे. त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २४.०१.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission ★ Greater Mumbai ★